आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२२ जुलै २०२५ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचा राजीनामा राष्ट्रपतींनी स्वीकारला

- ऑपरेशन सिंदूर आणि बिहारमधलं मतदार याद्या पुनरिक्षण यावर चर्चेसाठी संसदेत विरोधक आक्रमक/ दोन्ही सभागृहांचं कामकाज २ वाजेपर्यंत तहकूब

- २००६च्या मुंबई लोकल गाडी बॉम्बस्फोट खटल्यात सर्व १२ आरोपींच्या निर्दोष मुक्ततेला राज्य सरकारने दिलं सर्वोच्च न्यायालयात आव्हान

आणि

- फिडे महिला विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धेत भारताच्या दिव्या देशमुख आणि कोनेरु हंपी उपांत्य फेरीत दाखल

**<><><><>**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचा राजीनामा राष्ट्रपतींनी स्वीकारल्याची माहिती राज्यसभेत पीठासीन अधिकाऱ्यांनी सभागृहात दिली. जगदीप धनखड यांना उपराष्ट्रपतीपदासह देशाची सेवा करण्याच्या अनेक संधी मिळाल्या असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरल्या पोस्टमधे म्हटलं आहे. प्रधानमंत्र्यांनी धनखड यांना उत्तम आरोग्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

धनखड यांनी काल प्रकृतीच्या कारणामुळे आपल्या पदाचा राजीनामा दिला. आरोग्याशी निगडीत कारणं आणि वैद्यकीय उपचारांसाठी आपल्या पदाचा राजीनामा देत असल्याचं जगदीप धनखड यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना लिहिलेल्या पत्रात म्हटलं आहे. आपल्या कार्यकाळात राष्ट्रपतींनी केलेल्या सहकार्यासाठी त्यांनी आभार व्यक्त केले आहेत. त्याचबरोबर धनखड यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि सर्व केंद्रीय मंत्र्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त केली आहे. प्रधानमंत्र्यांचं अमूल्य सहकार्य आणि संसद सदस्यांकडून मिळालेला स्नेह आपल्या स्मृतींमध्ये कायम राहील असं धनखड यांनी म्हटलं आहे. ऑगस्ट २०२२ मधे धनखड यांनी उपराष्ट्रपतीपदाचा पदभार स्वीकारला होता.

धनखड यांच्या अचानक राजीनामा देण्यामुळे राजकीय वर्तुळात आश्चर्य व्यक्त केलं जात असून, संसदेच्या आवारात तो चर्चेचा विषय झाला होता.

<><><>

संसदेच्या दोन्ही सभागृहांमधे विविध मुद्द्यांवर गदारोळ झाल्यानं कामकाज आधी१२ वाजेपर्यंत आणि नंतर २ वाजेपर्यंत स्थगित करावं लागलं.

लोकसभेत सभापती ओम बिरला यांनी प्रश्नोत्तरांचा तास सुरु केल्यावर विरोधी पक्ष सदस्यांनी ऑपरेशन सिंदूर आणि बिहारमधलं मतदार याद्यांचं सखोल पुनरिक्षण या विषयांवर चर्चेची मागणी करत घोषणा द्यायला सुरुवात केली. शेती आणि शेतकऱ्यांविषयीचे महत्त्वाचे प्रश्न पटलावर असल्यानं शांतपणे कामकाज चालू द्यावं, असं सभापती बिरला यांनी सदस्यांना सांगितलं. केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंग चौहान यांनीही सहकार्याचं आवाहन केलं पण गदारोळ चालूच राहिल्यानं सभागृहाचं कामकाज सभपतींनी १२ वाजेपर्यंत स्थगित केलं. त्यानंतरही गदारोळ चालूच राहीला आणि कामकाज २ वाजेपर्यंत स्थगित झालं.

राज्यसभेतही विरोधकांनी बिहारमधलं मतदार याद्याचं सखोल पुनरिक्षण आणि इतर मुद्द्यांवर स्थगनप्रस्तावाची नोटीस दिली होती. मात्र उपाध्यक्ष हरिवंश यांनी ती फेटाळल्याच्या निषेधात विरोधकांनी घोषणाबाजी सुरु केली. गदारोळामुळे कामकाज आधी १२ वाजेपर्यंत आणि नंतर २ वाजेपर्यंत स्थगित करावं लागलं.

<><><>

बिहारमधे सुरू असलेल्या स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्ह्यू अर्थात मतदार यादी पुररिक्षणाच्या विरोधात आज संसद भवन परिसरात लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह विरोधी पक्षांच्या खासदारांनी निदर्शनं केली. या पडताळणीचा हेतू आणि त्याची कायदेशीर बाजू सरकारनं स्पष्ट करावी अशी मागणी विरोधकांनी केली.

दरम्यान, संसद भवन संकुलात आज इंडिया आघाडीच्या नेत्यांची बैठक झाली. या बैठकीला काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुुन खर्गे, लोकसभेतले विरोधी पक्ष नेते राहुुल गांधी यांच्यासह इंडिया आघाडीचे अनेक नेते उपस्थित होते. पावसाळी अधिवेशनासाठी एक रणनीती आखण्यावर यात चर्चा झाल्याचं सांगितलं गेलं.

<><><>

आज राष्ट्रध्वजदिन आहे. भारतीय संविधान सभेने १९४७ मधे २२ जुलै रोजी तिरंगा ध्वजाला राष्ट्रध्वज म्हणून मान्यता दिली होती. त्या निमित्त दरवर्षी हा दिवस राष्ट्रध्वजदिन म्हणून साजरा केला जातो. एक राष्ट्र, एक ध्वज - त्यागाने एकजूट आणि शांततेचं वचन ही यंदाच्या ध्वजदिनाची संकल्पना आहे.

<><><>

मुंबईत उपनगरी रेल्वेगाड्यांमध्ये २००६मध्ये झालेल्या बॉम्बस्फोट खटल्यातल्या सर्व १२ आरोपींना निर्दोष मुक्त करण्याच्या निर्णयाला महाराष्ट्र राज्य सरकारनं सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं आहे. या प्रकरणावर २४ जुलै रोजी सुनावणी होईल. मुंबईत ११ जुलै २००६ रोजी लोकल गाड्यांमध्ये सात बॉम्बस्फोट झाले होते. या बॉम्बस्फोटांमध्ये १८९ जण मृत्युमुखी पडले, तर ७०० हून अधिक जण जखमी झाले होते.

काल झालेल्या सुनावणीत उच्च न्यायालयानं सर्व आरोपींबाबतचा सत्र न्यायालयाचा निकाल रद्द करून त्यांची तातडीनं सुटका करण्याचे आदेश दिले. या घटनेत प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, घटनास्थळ आणि आरोपींकडून हस्तगत केलेलं साहित्य तसंच, कबुलीजबाब या तिन्ही पातळ्यांवर आरोपींविरुद्धचा एकही गुन्हा सिद्ध करण्यात तपास यंत्रणेला यश आलं नाही असं न्यायाधीश अनिल किलोर आणि श्याम चांडक यांच्या पीठानं स्पष्ट केलं. या प्रकरणातल्या एकाही साक्षीदाराची साक्ष विश्वसनीय नसल्याचं निरीक्षण न्यायालयानं नोंदवलं.

<><><>

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या उपव्यवस्थापकीय संचालक गीता गोपीनाथ पुढच्या महिन्यात पदमुक्त होतील. त्यानंतर त्या हार्वर्ड विद्यापीठातल्या अर्थशास्त्र विभागात प्राध्यापक म्हणून रुजू होणार आहेत. गीता गोपीनाथ जानेवारी १९ मधे मुख्य अर्थतज्ज्ञ म्हणून आंतरराष्ट्रीय नाणेनिधीत रूजू झाल्या होत्या. जानेवारी २०२२ मधे उपव्यवस्थापकीय संचालक म्हणून त्यांना बढती मिळाली. गीता गोपीनाथ यांनी अनिश्चित काळात सर्वोच्च मानकं प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न केले असं आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या व्यवस्थापकीय संचालक क्रिस्तलीना जॉर्जिवा म्हणाल्या.

<><><>

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२२ जुलै २०२५ - मंगळवार

फिडे महिला विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धेत भारताची दिव्या देशमुख हिनं उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. उपांत्य फेरीत पोहोचलेली ती दुसरी भारतीय महिला खेळाडू ठरली आहे. रॅपिड टाय ब्रेक मध्ये दिव्यानं आपल्याच देशाची ग्रँड मास्टर हरिका द्रोणवल्लीचा २-० असा पराभव केला. आता ती अंतिम चारच्या लढतीत आपल्याच देशाची ग्रँड मास्टर कोनेरू हम्पी सोबत सामील झाली असून उपांत्य फेरीत दिव्याचा सामना चीनच्या ग्रँड मास्टर तानझोंगीशी होणार आहे. तर आज संध्याकाळी हम्पीचा सामना दुसरी चिनी ग्रँड मास्टर लेई टिंगजीशी होणार आहे. या स्पर्धेत पहिले ३ क्रमांक पटकावणाऱ्या खेळाडू विमेन्स कँडिडेट्स स्पर्धेसाठी पात्र ठरणार आहेत. दरम्यान, ऑक्टोबरमध्ये होणाऱ्या बुद्धिबळ विश्वकरंडक २०२५ स्पर्धेचं यजमानपद भारताकडे असणार आहे. या संदर्भात लवकरच घोषणा करण्यात येईल, असे फिडे संघटनेने सांगितलं.

**<><><>**

महिला क्रिकेटमधे भारत इंग्लंड एकदिवसीय मालिकेतला शेवटचा आणि निर्णायक सामना आज इंग्लडमधे चेस्टर्ली स्ट्रीट इथं खेळला जाणार आहे. आतापर्यंत दोन्ही संघांनी एकेक सामना जिंकला असल्यानं आज अटीतटीची लढत अपेक्षित आहे. सामना भारतीय प्रमाणवेळेनुसार संध्याकाळी साडेपाच वाजता सुरु होईल.

**<><><>**

प्रसार भारतीने वृत्त विभागामध्ये बातम्यांची सत्यता तपासण्यापासून आशय निर्मितीपर्यंत सर्व ठिकाणी अचूकता आणि वेग वाढवण्यासाठी  कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर सुरु केला आहे असं प्रसारभारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी यांनी म्हटलं आहे. कंबोडियात सियाम रीप इथे आयोजित २०व्या आशिया माध्यम शिखर परिषदेच्या उदघाटन सत्रात ते काल बोलत होते.

**<><><>**

भारतीय हवामान विभागानं  हिमाचल प्रदेश, कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र, तेलंगणा आणि उत्तराखंडमधल्या  काही ठिकाणी आज मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. येत्या २५ तारखेपर्यंत अंदमान आणि निकोबार बेटांवर विजांच्या कडकडाटसह  वादळ येण्याची  शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

**//<><><><>//**